| | | | |
|---|---|---|---|
| Estd. 1962<br>"A++" Accredited by<br>NAAC(2021)<br>With CGPA 3.52 | SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR<br>416 004, MAHARASHTRA<br>PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,<br>दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,<br>www.unishivaji.ac.in<br>विद्यार्थी विकास विभाग<br>Dr. S. G. Ghane<br>Director, Students' Development<br>Phone – (0231) 2609175, 2609475<br>Email: dsw@unishivaji.ac.in | | |

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/४३९ दि. 11 MAY 2026

प्रति,
मा. प्राचार्य /प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण, संस्था
मा. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषयः— सन २०२६—२०२७ या शैक्षणिक वर्षाचे विद्यार्थी पालक शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी रक्कम पाठविणेबाबत.**

महोदय,/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात, आपणांस कळविण्यात येते की, सन २०२६—२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये/अधिविभागामध्ये प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रती विद्यार्थी रू. १००/— प्रती शिक्षक प्रती वर्षी रू. ५००/—प्रशासकीय सेवक वर्ग १ व वर्ग २ अधिकारी — प्रती व्यक्ती प्रती वर्षी रू. ५००/— वर्ग ३ व वर्ग ४ प्रती सेवक प्रती वर्षी रू. ३००/— व संस्थाचालक पदाधिकारी प्रती सदस्य प्रतीवर्षी रू. ७००/— इतकी कल्याण निधी रक्कम घेण्यात यावी.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार आपल्या महाविद्यालयात **प्रवेशित विद्यार्थ्यांकडून** प्रती विद्यार्थी रु. १००/— याप्रमाणे कल्याण निधी रक्कम घेवून **संलग्नता विभागामार्फत दिलेल्या परिपत्रकामधील तारखांनुसार प्रथम सत्र संपण्यापूर्वी विद्यापीठामध्ये अंदाजपत्रकीय शिर्षक E.3.R.49 या खाती ऑनलाईन पद्धतीने जमा करावयाची आहे.**

**जर प्रथम सत्र संपण्यापुर्वी निधी भरणा केली नाही तर एकूण रक्कमेवर १५% शुल्कासह रक्कम आकारण्यात येईल. एखाद्ये महाविद्यालय/संस्था दुर्घटना घडल्यानंतर कल्याण निधी रक्कम भरणा करत असल्यास सदर प्रस्तावाची रक्कम + आकारणी केलेली शुल्क + १५% अतिरिक्त शुल्क आकारण्यात येईल.**

सदरची रक्कम विद्यापीठाकडे जमा केल्याच्या पावतीची प्रत व कल्याण निधी धारकांची यादी खाली नमुद केल्याप्रमाणे विहीत नमुन्यात विद्यार्थी विकास विभागाकडे त्वरीत जमा करावी. सदर पावती व यादी एकाच वेळी जमा करावी, स्वतंत्रपणे जमा करून घेतली जाणार नाही. तसेच सदरची पावती व यादी जमा केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयाचे कल्याण निधी प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

**असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच महाविद्यालयामार्फत फक्त विद्यार्थ्यांची कल्याण निधी रक्कम भरली जाते. मात्र नियमित सेवेतील शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी, संस्थाचालक यांची कल्याण निधी रक्कम भरली जात नाही. याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद प्रमाणे शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक यांची कल्याण निधी रक्कम सोबत जोडलेल्या नियमावलीमध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. ३१ ऑगस्ट, २०२६ पुर्वी भरणे बंधनकारक आहे.**

**उपरोक्त नमुद प्रमाणे कल्याण निधी रक्कम विद्यापीठात वेळेत न भरल्यास कल्याण निधी प्रस्तावाबाबत महाविद्यालय जबाबदार राहील. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय सेवक, संस्थाचाल पदाधिकारी या सर्व घटकांची कल्याण निधी रक्कम व नमुद केल्याप्रमाणे मुदतीमध्ये भरल्याशिवाय आपल्या महाविद्यालयाकडून प्राप्त कल्याण निधी प्रस्तावावर कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

...२

<u>कल्याण निधी रक्कमेतून मिळणारे फायदे</u>

| अ. क्रं | तपशिल | आकारण्यात येणारे शुल्क | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी | १००/— | विद्यार्थी मयत झाल्यास रु. १,५०,०००/—<br>विद्यार्थ्यांची आई मयत झाल्यास रु. ७५,०००/—<br>विद्यार्थ्यांची वडील मयत झाल्यास रु. ७५,०००/—<br>विद्यार्थी यांचे अपघाताने किंवा आजारपणामुळे अवयव पुर्णपर्ण निकामी झाले तर<br>एक हात रु. २५,०००/— दोन हात रु. ५०,०००/—<br>एक पाय रु. २५,०००/— दोन पाय रु. ५०,०००/—<br>एक डोळा रु. २५,०००/— दोन डोळे रु. ५०,०००/—<br>विद्यार्थ्यांच्या पालकांचे अवयव पुर्णपर्ण निकामी झाले तर<br>एक हात, एक पाय, एक डोळा यासाठी जास्तीत जास्त रु. २५,०००/—<br>दोन हात, दोन पाय, दोन डोळा यासाठी जास्तीत जास्त रु. ५०,०००/— |
| २ | शिक्षक | ५००/— | शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी/संस्थाचालक पदाधिकारी मयत झाल्यास रु.1,50,000/-<br><br>शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी/संस्थाचालक पदाधिकारी यांचे अपघाताने किंवा आजारपणामुळे अवयव पुर्णपर्ण निकामी झाले तर<br>एक हात रु. २५,०००/— दोन हात रु. ५०,०००/—<br>एक पाय रु. २५,०००/— दोन पाय रु. ५०,०००/—<br>एक डोळा रु. २५,०००/— दोन डोळे रु. ५०,०००/— |
| ३ | प्रशासकीय सेवक वर्ग १ व वर्ग २ अधिकारी | ५००/— | |
| ४ | प्रशासकीय सेवक वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी | ३००/— | |
| ५ | संस्थाचालक पदाधिकारी | ७००/— | |

तसेच बऱ्याच महाविद्यालयामार्फत संपूर्ण प्रवेशित विद्यार्थ्यांचा निधी भरला जात नाही. विद्यापीठामध्ये प्रती विद्यार्थी भरलेली रक्कम व महाविद्यालयामार्फत ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) या पोर्टलवर नमुद केलेली विद्यार्थी संख्या यामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) च्या पोर्टलवर नमुद केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार सदर निधी जमा करावयाचा आहे.

**<u>कल्याण निधी भरलेल्या सर्व विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक यांची यादी मा. प्राचार्य यांच्या सहीने खालील नमुन्यात पाठविणे अनिवार्य आहे.</u>**

**विद्यार्थी :—**

| अ. क्रं | विद्यार्थ्यांचे नाव | वय | वर्ग | वारसदाराचे नाव व नाते | आई व वडिल | वय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांची यादी नमुना :—**

| अ. क्रं | शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचे नाव | वय | वारसदाराचे नाव | नाते |
|---|---|---|---|---|
| | | | | |

कळावे,

आपला विश्वासू

8/8/16

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत: वरीलप्रमाणे